# शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद,बीड

जा.क्र.प्रावि-2/स्वयंअ/ 2261 /2017-18 दिनांक : / /2018

25 JUN 2018

स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळा

प्रथम मान्यता आदेश:

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
आधार फाऊंडेशन गेवराई
ता.गेवराई जि.बीड.

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- 1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम 2012 (सन 2013 चा 01)
2) शासन निर्णय क्र. एसएफएस-1018/प्र.क्र.539/एसएम-2 दि.29 मे 2018.
3) मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग, औरंगबाद यांचे परवानगी आदेश क्र. स्वयं/ एमसीएन/मावि-1/2018-19/7367/71 दि. 01 जून 2018.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये नवीन शाळा स्थापन करण्याकरीता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता सादर केलेल्या प्रस्तावानूसार संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या शासन निर्णयानूसार नवीन शाळा स्थापन करणे करीता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विवरणपत्र

| अ.क्र. | परवानगी यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व सविस्तर पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | - | आधार फाऊंडेशन गेवराई ता.गेवराई जि.बीड | केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कुल गेवराई ता.गेवराई जि.बीड | इंग्रजी | नवीन शाळा | सी.बी.एस.ई. | प्राथ. ते उच्च माध्य. ई.1 ली ते 12 वी सर्व शाखा इंग्रजी माध्य. (सी.बी.एस.ई.) पॅटर्न |

अटी व शर्ती :-

1. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदींची पूर्तता करणे संस्थेवर / शाळेवर बंधनकारक राहील.

2. संदर्भ क्र.2 च्या शासन निर्णयाद्वारे ज्या व्यवस्थापनास सन 2018-19 साठी पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्याकरीता / दर्जावाढ करण्याकरीता शासनाच्या विहीत नियमानूसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णयाच्या दिनांकापासून (18) महिन्यांच्या आत शाळा सुरू करणे बंधनकारक राहील, अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

पान नं..2 वर

3. सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. 20 जून 2012 मध्ये विहीत केलेल्या सर्वकष धोरणानूसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) शासन निर्णयातील परिच्छेद क्र. 10 नूसार अशा शाळांना या कार्यालयाकडून अशी मान्यता मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधीत मंडळाच्या संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शासनास दर्जा करावा लागेल. सदर अर्जाची छाननी करून संबंधीत शाळा विहीत निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) प्राप्त करून घेणे संस्थेवर / शाळेवर बंधनकारक राहील.

4. वरील विवरणपत्रातील परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना / दर्जावाढ शाळांना -

अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे पालन करणे बंधनकारक राहील.

ब) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम 2012 (सन 2013 चा 01 ) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

5. संस्थेस शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळेस परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

6. संदर्भिय शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांनी / दर्जावाढ झालेल्या शाळांनी U-Dise (Unified District Information System for Education ) मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गामध्ये नोंद करून क्रमांक प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

7. संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ शाळउ असा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

8. दर्जावाढ मंजूर झालेल्या शाळेमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळेच्या संदर्भात RTE Act 2009 मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. याबाबत संबंधीत गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र तपासणी अहवाला सोबत जोडावे. तसेच

अ) संबंधीत गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत आपण शाळेसाठी प्रस्तावित केलेली जागा / जमीन ही नियमानूसार किमान एक सलग / अथवा शाळेसाठी योग्य असल्या बाबत प्रमाणपत्र तपासणी अहवालासोबत जोडण्यात यावे. संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी याबबत योग्य प्रमाणपत्र दिलेले नसल्यास शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

ब) दाननिधी (कायम मुदत ठेव ) पावती संस्थेच्या नावावर शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षासाठी असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नुतनीकरण करण्याबाबत संबंधीत संस्था / शाळा व्यवस्थपनाने शिक्षणाधिकारी (प्रा.) यांचेकडे तारण म्हणून ठेवणे बंधनकारक राहील.

9. खाते मान्यता (3.1) प्रस्ताव या कार्यालयास सादर करतांना तपासणी अहवालासह (संबंधीत गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रासह) सादर करणे बंधनकारक आहे.

वरील अटी व शर्तींचे अधिन राहून सन 2018-19 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आपल्या संस्था संचलित शाळेस या आदेशान्वये प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, बीड

प्रतिलिपी :-

1. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -32.
2. मा.संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे.
3. मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
4. मुख्याध्यापक, ____________________

ता.____________ जि.बीड.

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, बीड